**सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यासंदर्भातील तरतूदीमध्ये सुधारणा करण्याबाबत .**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२३१८/प्र.क्र.३/का.१७**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक: ०१ मार्च, २०१८

**वाचा -**

1. **सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकः EXD-१०७६/१९४५/१३७/XVII, दि. १ नोव्हेंबर, १९७७.**
2. **शासन परिपत्रक क्र. परीक्षा-१००८/४३८/प्र.क्र.२६/२००८/१७, दि. ४ डिसेंबर, २००८.**

**प्रस्तावना -**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. १ नोव्हेंबर, १९७७ अन्वये वयाची ४५ वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना शासन सेवेत कायम करणे, नियमित करणे किंवा पदोन्नती देण्याकरीता घेण्यात येणाऱ्या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येते. सदर निर्णय १९७७ रोजी झाला असून तेव्हा मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ नुसार शासन सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा २५ वर्षे एवढी होती. म्हणजेच वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे विभागीय परीक्षेतून सूट घेतांना शासकीय कर्मचाऱ्याची किमान २० वर्षे शासन सेवा होत होती. तथापि, तद्नंतर वेळोवेळी शासन सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा वाढवून सन २०१६ मध्ये खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासर्गीयांसाठी ४३ वर्षे एवढी करण्यात आली आहे. तथापि, त्यानुसार सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याच्या वयोमर्यादेत कालपरत्वे सुधारणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता उमेदवार वयाच्या ४३ व्या वर्षी शासन सेवेत दाखल होवू शकत असून लगेच एक-दोन वर्षांमध्ये वयाची ४५ वर्षे पूर्ण झाल्याच्या कारणास्तव त्यांना सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट द्यावी लागते. त्यामुळे सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची वयोमर्यादा वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

उपरोक्त प्रस्तावनेत नमूद पार्श्वभूमी विचारात घेवून संदर्भाधिन दि. १ नोव्हेंबर, १९७७ चा शासन निर्णय रद्द करुन आता शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे -

१. शासन सेवेत कायम करणे किंवा नियमित करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना वयाची ४५ वर्षे पूर्ण केल्यानंतर मिळणारी सूट यापूढे वयाची ५० वर्षे पूर्ण केल्यानंतर अनुज्ञेय राहील.

(अ) मात्र, यास खालील अपवाद राहतील:-

(१) प्रशासकीय विभागांनी त्यांच्याकडील तांत्रिक स्वरुपाचे कामकाज हाताळणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना शासन सेवेत नियमित किंवा कायम करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या सेवाप्रवेशोत्तर/विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून वयोमर्यादेची सूट न देण्याचा जाणिवपूर्वक निर्णय घेतला असेल तर त्यांचेसाठी उपरोक्त वयोमर्यादेची सूट लागू राहणार नाही.

(२) परिवीक्षाधीन कालावधीत सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण न केल्यास उमेदवाराची सेवा समाप्त करण्याची जर सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असेल तर अशा परिवीक्षाधीन अधिकारी/कर्मचारी याने त्याच्या वयाची ५० वर्षे पूर्ण केली या कारणास्तव परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट देता येणार नाही.

(ब) सेवाप्रवेशोत्तर/विभागीय परीक्षा अनुत्तीर्ण झाल्यामुळे रोखून ठेवण्यात आलेली वेतनवाढ ही उमेदवाराने परीक्षा उत्तीर्ण केल्याच्या दिनांकापासून किंवा उपरोक्तनूसार वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्यामुळे परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाल्याच्या दिनांकापासून देय असेल.

२. पदोन्नतीसाठीची विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याकरीता कर्मचाऱ्याने त्या पदावर किमान १५ वर्षे सेवा पूर्ण करणे अनिवार्य राहील. त्यामुळे संबंधित पदावर कर्मचाऱ्याची १५ वर्षे सेवा पूर्ण झाल्याचा दिनांक किंवा त्याच्या वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्यानंतर लगतचा दिनांक हा कर्मचाऱ्यास पदोन्नतीसाठी विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याचा दिनांक समजण्यात येईल.

३. सर्व प्रशासकीय विभागांनी सदर निर्णय त्यांच्या अखत्यारितील सर्व कार्यालयांच्या निदर्शनास आणून द्यावा व सर्व संबंधित सेवाप्रवेश नियम/विभागीय परीक्षा नियमातील तरतूदीमध्ये तात्काळ सुधारणा कराव्यात.

४. या आदेशाच्या दिनांकापासून सदर सुधारणा अंमलात येतील. त्यामुळे सर्व प्रशासकीय विभागांनी संबंधित परीक्षा नियम/सेवाप्रवेश नियमांमध्ये सुधारणा करताना या आदेशाचा दिनांक हा सुधारणा अंमलात आणण्याचा दिनांक असेल अशी स्पष्ट तरतूद करावी. तसेच परीक्षा नियमामध्ये सुधारणा करेपर्यंतच्या कालावधीतही उमेदवाराला वयोमर्यादेची सूट देण्याबाबत या आदेशातील तरतुदीनुसार अंमलबजावणी करावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०११५०२२३७५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Pandurang Wagh

Digitally signed by Rajendra Pandurang Wagh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9e4468a63fe9f9f2a565a0790f46e3c14a3715b2370430433845720a9c4c8107, serialNumber=7adb1868a49b8719e27d3453044671a8ceddbd04af26dd2089ed03e6b1bd92bd, cn=Rajendra Pandurang Wagh
Date: 2018.03.01 15:02:38 +05'30'

**(राजेंद्र वाघ)**

अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग

महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१ मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२ मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३ सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४ मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५ सर्व मा. विधानमंडळ सदस्य.
६ मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,
७ सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८ सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
९ प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१० सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, (विधानपरिषद), मुंबई,
११ महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१२ महालेखापाल (लेखापरीक्षा),-१, महाराष्ट्र, मुंबई,
१३ महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१४ महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र , मुंबई,
१५ सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई,
१६ महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,
१७ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८ निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१९ मुख्य लेखा परीक्षक (निवासी लेखे), कोकण भवन, नवी मुंबई,
२० सर्व विभागीय आयुक्त/ सर्व जिल्हाधिकारी, (संबंधित विभागामार्फत)
२१ सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, (संबंधित विभागामार्फत)
२२ सामान्य प्रशासन विभाग/कार्या-१४-अ/ब,कार्या-१२,कार्या-१९,
२३ निवडनस्ती